# रासेयोच्या विशेष युवक शिबिराचे उद्घाटन



**देगलूर / प्रतिनिधी**

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालय देगलूर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'युवकांचा ध्यास ग्राम - शहर विकास' विशेष युवक शिबिर मौजे रामपूर येथे दि.३१ जानेवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान होत आहे. शिबिराचे उद्घाटन दि.०१ फेब्रुवारी रोजी झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.मोहन खताळ तर उद्घाटक म्हणून नगर परिषदेचे मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, प्रमुख पाहुणे म्हणून रा. से.यो. विभागीय समन्वयक डॉ. शिवाजी कांबळे, अ.व्या.शि. संस्थेचे कार्यकारिणी सदस्य देवेंद्र मोतेवार, रवींद्र द्याडे, उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा.उत्तमकुमार कांबळे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगे महाराज आणि महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन झाली. कार्यक्रमाधिकारी प्रा. विनोद काळे यांनी प्रास्ताविक केले. मुख्याधिकारी चव्हाण यांनी स्पर्धा परीक्षेत टिकण्यासाठी विद्यार्थ्यांनी कठोर मेहनत घेणे अत्यंत गरजेचे असून राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी जर मेहनत घेतला तर तो नक्कीच वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेमध्ये उत्तीर्ण होईल, असे प्रतिपादित केले. प्रमुख पाहुणे डॉ. कांबळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देत, राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो, सोबतच राष्ट्राच्या विकासाकरिता रा. से. यो. युवक हा नेहमी तत्पर असतो, असे सांगितले. मोतेवार यांनी शिबिरास शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ.खताळ यांनी अध्यक्षीय समारोप केला.

सूत्रसंचालन डॉ.व्यंकट खंदकुरे तर आभार प्रा.गणेश क्यादरे यांनी मानले. या उद्घाटन सोहळयास सरपंच सौ. स्नेहा पांडवे, जि.प.प्रा. शाळेचे मुख्याध्यापक सत्यविजय हसनाळे, कार्यक्रमाधिकारी प्रा.संतोष वानोळे, डॉ.संतोष येरावार, डॉ.विठ्ठल जंबाले, डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, डॉ.बालाजी कत्तूरवार, डॉ. संजय देबडे, डॉ.व्यंकट शेरीकर, डॉ. सुरेश काशिदे, प्रा.साई आकाश रोटे, प्रा.सौ. देबडवार, प्रा.सौ.शोभा वद्देवार, प्रा.रत्नाकर चिद्रावार, मारोती सोनकांबळे, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, महाविद्यालयातील प्राध्यापक व स्वयंसेवक-स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner